# राष्ट्रशाहीर म. ना. नानिवडेकर (१९०४–६२)

## व्यक्तिपरिचय

माझे वडील शाहीर महादेव नारायण नानिवडेकर यांचा जन्म १९०४ मध्ये किसरूळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे झाला. त्या काळी भाजारभोगावपासून ६ कि.मी. पायी जावे लागे. आता एस.टी. सुरू झाली आहे.

१९२३ साली मॅट्रिक झाल्यावर प्रथम नकला करत असत. ज्या समाजातील विविध व्यक्तींच्या असत कीर्तनकार, भटजी वगैरे.



१९२८ साली मुंबईला ब्राह्मण सभेत खाडिलकरांचा पोवाडा आणि नानिवडेकरांच्या नकला असा कार्यक्रम होता. तिथे अनेकांनी त्यांना तुमचा आवाज पोवाड्यासाठी जास्त चांगला आहे तेव्हा तुम्ही शाहीर व्हा, असे सांगितले. प्रथम झाशीच्या राणीचा पोवाडा स्वत: रचला ज्याच्या HMV कंपनीने ३ रेकॉर्ड्स काढल्या. नंतर शिवाजी महाराज, टिळक, म. गांधी अशा मोठ्या व्यक्तींवरदेखील पोवाडे रचले. त्यांच्या पोवाड्याचे पहिले कडवे खूप जोरदार असे. उदा. पू. आहिल्याबाई होळकर यांच्यावरील पोवाडा धन्य राणी अहिल्या होळकर। राज्य धुरंधर । पुण्याशील थोर । स्वधर्मो द्धार जिने हो केला। आसेतू हिमाचला वरी क्षेत्र मंदिरी देवत परी जिचा बोलबाला।। या सगळ्याच्या HMV कंपनीने ७८ RPM च्या रेकॉर्ड्स काढल्या होत्या. काही पोवाडे www.powada.com/lyries/ mahadev nanivadekar/index.htm येथे उपलब्ध आहेत. कोल्हापूरमधील कोष्टी गल्लीतील त्यांच्या स्वत:च्या घरात प्रॅक्टिस चालत असे. गणेशोत्सवात दहाही दिवस त्यांचे कार्यक्रम साखर कारखाने/ पुणे–मुंबई अशा ठिकाणी होत असत. ते आकाशवाणी कलाकार होते.

ते एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. चित्रकलेत त्यांना चांगली गती होती. दोन्ही हातांनी ते चित्र काढत. तसेच चांगल्यापैकी वक्तेही होते. कोणत्याही विषयावर अर्धा तास सहज बोलत. तसेच लाठी–दांडपट्टा या पारंपरिक खेळात चांगलेच प्रावीण्य मिळवले होते. हातात जर लाठी असेल तर ५–६ जणांपासून संरक्षण कसे करावे, याचे प्रात्यक्षिक देत असत. महिलांनादेखील या कलेचे प्रशिक्षण ते देत असत. याखेरीज ते चांगले नटदेखील होते. नेताजी पालकर या भालजींच्या चित्रपटात विनोदी भूमिका बजावली होती व एक लावणीदेखील गायली होती. रंगभूमीवरदेखील त्यांनी नट, दिग्दर्शक म्हणून काम केले होते. गदिमांच्या 'युद्धाच्या सावल्या' हे नाटक त्यांनी स्वत: बसवून कामदेखील केले होते व भावगीत गायक दत्ता वाळवेकर यांनादेखील सामील केले होते.

पोहण्यामध्ये देखील ते तरबेज होते. निरनिराळ्या प्रकारच्या उड्या ही त्यांची खासियत होती. तसेच ते प्रशिक्षक म्हणूनदेखील काम करत असत. शाळेचे शिक्षक म्हणूनही त्यांनी काही काळ नोकरी केली.

ढोलकी वाजवण्यातही ते प्रवीण होते. १९३३ साली बंगाली नर्तकी मीरादेवी यांच्या ग्रुपमधून इंग्लंडला जाऊन दांडपट्ट्याची फेकचे प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच सिलोनी नर्तक दाम्पत्य सूर्यसेन व नूतनदेवी यांच्या ग्रुपमधून परदेशात जाऊन विलायतेत सर्वोत्कृष्ट तलवारबहादूर असा गौरव मिळवला होता. यांच्या २५ व्या पुण्यतिथीला 'नरसिंह' या नावाने स्मृती विशेषांक काढण्यात आला होता. ज्याचे संपादक श्री. बिंदुमाधव जोशी होते. कार्यकारी संपादक रामचंद्र देखणे आणि सहाय्यक संपादक ज्ञानेश्वर जाधव होते.

अश्या या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाला शतश: प्रणाम!

**– रा. म. नानिवडेकर**
१, जयंती सोसायटी,
टिळकवाडी, नासिक ४२२००२
मोबा : ९४२१७०५८६४

## स्वर्गस्थ पत्नीस

उदंड आयुष्य पतीला दे देवा
अखंड प्रार्थिले माझ्यासाठी तुवा
ऐकून तुझी ती उत्कट मागणी
दीर्घायुष्य मला दिधले देवांनी
परी पत्नीसाठी कोणाही पतीने
प्रार्थिलेले न देवा व्रत वैकल्याने
परंतु जेव्हा मी प्रार्थिले शेवटी
नाहीच ऐकली देवाने हाक ती
माझेच संचित दुबळे वंचित
तुझीच पुण्याई प्रभावी खचित
सौभाग्यमंडित गेलीस स्वर्गात
तुझे ग जीवित सफल कृतार्थ
तुझिया वाणीत प्रीतीचे स्पंदन
तुझिया कृतीत सेवेचे चंदन
तुझिया संगती सुखाचा संसार
तुझिया कुशीत वंशाचा विस्तार
तुझिया नावात उबेचे मांगल्य
तुझिया रूपात संध्येचे लावण्य
संध्या ती सरली अनंती विरली
माझिया जीवनी रजनी उरली

**प्रेषक : गं. वि. ठेकेदार**
**द्वारा किशोर गं. ठेकेदार**
**मोबा : ९३७३५९७४७६**